कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम .
रत्नागिरी जिल्हयाच्या प्रकल्प प्रस्तावांना
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः कोग्रापविका- २०१९/प्र.क्र. १७० /योजना -६,
बांधकाम भवन, तळ मजला, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.कोवियो-२०१५/प्र.क्र.७५/योजना-९ दि.२३.११.२०१५.

२) शासन परिपत्रक क्रमांक : विकास -२०१७/प्र.क्र.२७२/योजना-६, दि. ३१ मार्च, २०१८.

प्रस्तावना : -

कोकणातील ग्रामीण भागातील भुमीपुत्रांना त्यांच्या गावात रोजगार व स्वंय रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने तसेच कोकणातील विकास कामांची गती वाढविणे या करीता ग्रामीण भागातील पर्यटनाला चालना देण्यासाठी, पर्यटनाचा विकास होणाऱ्या गावांमध्ये पर्यटनासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे व पर्यायाने गावांचा विकास करणे या उद्देशाने राज्य शासनाने "कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम" ही योजना घोषित केलेली आहे . या योजनेबाबतचे सविस्तर आदेश व मार्गदर्शक सुचना शासनाने संदर्भीय दि. २३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत. या शासन निर्णयास अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या कार्यालयाने राज्य स्तरीय समिती, कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम यांच्या मान्यतेसाठी सन २०१९ -२० करिता सादर केलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमातंर्गत संदर्भीय दि.२३.११.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी सादर केलेल्या सन २०१९-२० च्या प्रस्तावांना/विकास आराखडयांना अनुसरुन खालील यादीत नमूद केलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	तालुका	**कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमातंर्गत रत्नागिरी जिल्ह्यतील कामाचे नांवे**	**अंदाजपत्रकीय रक्कम रुपये लाखात**
१.	राजापूर	कशेळी आवळीचीवाडी ते समुद्र किनारा पोहोच रस्ता	२०.००
२.		कशेळी आवळीचीवाडी ते समुद्र किनारा स्वच्छतागृह आणि रेलिंग बांधणे	१०.००
३.		जैतापूर अनंतवाडी ते सागरी किनारा पोच रस्ता बांधणे	७.००
४.		जैतापूर अनंतवाडी ते सागरी किनारा बैठक व्यवस्था	५.००
५.		जुवे जैतापूर बेट पोच रस्ता बांधणे	८.००

६.	पावस	पावस येथील श्री स्वामी स्वरूपानंद मंदिर मुख्य रस्ता ते नालेवठार रस्ता मजबुतीकरण डांबरीकरण करणे , ता. पावस, जि. रत्नागिरी	२०.००
७.		पावस येथील श्री स्वामी स्वरूपानंद मंदिर मुख्य रस्ता ते जुईवाडी , पाटीलवाडी, मळगेवाडी , स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे , ता. पावस, जि. रत्नागिरी	१०.००
८.		पानवळ चांदसूर्या फाटा ते घावाळीवाडी रस्ता मजबुतीकरण डांबरीकरण करणे, ता. पावस, जि. रत्नागिरी	२५.००
९.		पावस येथील श्री स्वामी स्वरूपानंद जन्मस्थान ते काटेवाडी भाटीवाडी रस्ता मजबुतीकरण डांबरीकरण करणे, ता. पावस, जि. रत्नागिरी	२५.००
१०.	गुहागर	वेळेश्वर येथे समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांकरिता ए.टी.व्ही. बाईक , ता. गुहागर, जि. रत्नागिरी	५.००
११.	रत्नागिरी	उक्षी येथे कापळशिल्प संरक्षण भिंत बांधणे , पोहोचा रस्ता करणे , ता.जि . रत्नागिरी	१५.००
१२.		एकूण	१५०.००

२. उपरोक्त संदर्भाधिन क्र. ३ येथील शासन परिपत्रकानुसार ग्रामविकास विभागाने दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून LRS ही संगणकीय प्रणाली स्वीकारली असून, यापुढे कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमातंर्गत कामे पूर्ण करणाऱ्या ठेकेदारांचे प्रदान थेट ग्राम विकास विभाग स्तरावरुन केले जाणार आहे. सबब सदरील कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधीत स्थानिक प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व उत्कृष्ट काम पूर्तता अहवालाच्या आधारे प्राप्त झालेली निधींची देयके केवळ दायित्व नोंद (LRS-Liability Register System) या प्रणालीमार्फत शासनास सादर करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांची राहील. त्यानंतर सदरची देयके शासनामार्फत संबंधित पुरवठादार / ठेकेदारास अदा केले जातील . सदर निधी आवश्यक बाबींवर खर्च झाला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषद , रत्नागिरी यांनी शासनास व महालेखापालांस सादर करावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी वरील कामांसाठी येणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून लेखाशिर्ष मागणी क्र . एल-३, २५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम, (००) (०७) कोकण पर्यटन विकास कार्यक्रम ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) -(२५१५ २४३२) मधून भागविण्यात यावा. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, तसेच कामे उत्कृष्ट दर्जाची होतील याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदर रत्नागिरी यांनी विशेष काळजी घ्यावी. अन्यथा संबंधितांकडून वसूलीसह कारवाई शासन स्तरावरून केली जाईल .

४. सदर कामे इतर कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी खात्री करावी.

५. ही मंजुरी वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/विनियम, दि.१५.०५.२००९ अन्वये प्रसिध्द केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग - पहिला, उप-विभाग-तीन मधील अनुक्रमांक ४ येथील परिच्छेद क्र. २७ (२) नुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६१९०२४१८९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.09.17 14:52:30 +05'30'

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/ विधानसभा,मुंबई.
२. प्रधान सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त,कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई
४. मुख्य वास्तुविशारद, सां.बां.वि., बांधकाम भवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१,मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
८. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१०. उप सचिव, पर्यटन,मंत्रालय, मुंबई.
११. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१२. मा. मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१३. मा. राज्यमंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१४. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, रत्नागिरी.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.
१६. निवड नस्ती, कार्यासन योजना-६.